**ठळक बातम्या**

- कृत्रिम बुद्धिमत्तेचं लोकशाहीकरण होणं आवश्यक असल्याचं प्रधानमंत्र्यांचं प्रतिपादन; नवी दिल्ली इथं आयोजित इंडिया एआय इम्पॅक्ट समिट २०२६ चं औपचारिक उद्घाटन

- निवडणुकीच्या आधी राज्य सरकारांकडून जाहीर होणाऱ्या मोफत सुविधा आणि योजनांवर सर्वोच्च न्यायालयाचे ताशेरे

- छत्रपती शिवाजी महाराज यांची जयंती आज देशभरात उत्साहात साजरी

- पवित्र रमजान महिन्याला आजपासून सुरुवात

**आणि**

- नायजेरियामधे खाणीत विषारी वायू गळतीमुळे ३३ कामगारांचा मृत्यू

**<><><><><>**

कृत्रिम बुद्धिमत्तेचं लोकशाहीकरण होणं आवश्यक असून, विशेषतः ग्लोबल साऊथ साठी कृत्रिम बुद्धिमत्ता हे समावेशन आणि सक्षमतेचं साधन बनायला हवं असं प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी म्हटलं आहे. ते आज नवी दिल्लीत भारत मंडपम इथं इंडिया एआय इम्पॅक्ट समिट २०२६ चं औपचारिक उद्घाटन करताना बोलताना बोलत होते. जगातली सर्वात मोठी तरुण लोकसंख्या, आणि सर्वात मोठ्या तंत्रज्ञान प्रतिभेचं केंद्र असलेल्या भारतात एआय, म्हणजेच कृत्रिम बुद्धिमत्तेवरच्या परिषदेचं आयोजन होत असून, ग्लोबल साऊथ मधल्या देशांसाठी ही अभिमानास्पद गोष्ट आहे, असं ते यावेळी म्हणाले.

- **- होल्ड बाईट मोदी - -**

कृत्रिम बुद्धिमत्ता हा मानवी इतिहासातला एक परिवर्तनकारी अध्याय असून, भारत केवळ एआय क्रांतीचा भाग नाही, तर त्याचं नेतृत्व करतो, आणि त्याला आकार देतो, असं पंतप्रधान म्हणाले. या परिषदेला जगभरातले नेते आणि उद्योग आघाडीच्या कंपन्यांचे मुख्य कार्यकारी अधिकारी उपस्थित आहेत.

कृत्रिम बुद्धिमत्ता हे एक मूलभूत तंत्रज्ञान असून, लोकांच्या काम करण्याच्या, शिकण्याच्या आणि निर्णय घेण्याच्या पद्धतीमध्ये बदल घडवून आणत असल्याचं केंद्रीय

इलेक्ट्रॉनिक्स आणि माहिती तंत्रज्ञान मंत्री **अश्विनी वैष्णव** यावेळी म्हणाले. परिषदेत उपस्थित असलेल्या जागतिक नेत्यांचं स्वागत करताना ते म्हणाले की, सरकार एआय अंतर्गत सर्व ५ स्तरांवर काम करत आहे. सरकारने एक कॉमन कॉम्प्युट प्लॅटफॉर्म तयार केला असून, तो स्टार्टअप्स, संशोधक, शैक्षणिक संस्था आणि विद्यार्थ्यांना परवडणाऱ्या दरात ३८ हजार GPUs पर्यंत प्रवेश प्रदान करेल अशी माहिती त्यांनी यावेळी दिली.

**<><><><><>**

आगामी पाच वर्षांच्या कालावधीत भारत आणि अमेरिका यांना समुद्राखालील केबलच्या माध्यमातून जोडण्यात येईल, असं सांगून यासाठी पंधराशे कोटी डॉलर्सची गुंतवणूक करण्याची घोषणा गुगलनं केली आहे. अमेरिका इंडिया कनेक्ट या पायाभूत सुविधा सहकार्य उपक्रमाच्या माध्यमातून विशाखापट्टणमजवळ विझाग इथं समुद्राखालील नवीन आंतरराष्ट्रीय केबल स्थानक उभारलं जाईल, अशी माहिती गुगलनं काल भारत एआय इम्पॅक्ट शिखर परिषदेत दिली. याशिवाय भारताला सिंगापूर, दक्षिण अफ्रिका आणि ऑस्ट्रेलियाशी जोडणारे तीन नवीन समुद्राखालील केबलमार्ग तसंच चार धोरणात्मक फायबर ऑप्टीक मार्ग स्थापन करण्यात येतील असं गुगलचे मुख्य कार्यकारी अधिकारी सुंदर पिचाई यांनी सांगितलं.

**<><><><><>**

निवडणुकीच्या आधी राज्य सरकारांकडून जाहीर होणाऱ्या मोफत सुविधा आणि योजनांवर सर्वोच्च न्यायालयानं आज ताशेरे ओढले. तमिळनाडू पॉवर डिस्ट्रीब्युशन कंपनी लिमिटेडनं दाखल केलेल्या याचिकेवरची ही सुनावणी सरन्यायाधीश न्यायमूर्ती सूर्यकांत, न्यायमूर्ती जॉयमल्या बॅगची आणि न्यायमूर्ती विपुल पंचोली यांच्या खंडपीठासमोर झाली. या याचिकेत वीज सुधारणा नियम २०२४मधील नियम २३ ला आव्हान देण्यात आलं आहे. अशा मोफत योजना देशाच्या दीर्घकालीन आर्थिक विकासाला अडथळा आणतात, असं निरीक्षण सर्वोच्च न्यायालयानं नोंदवलं आणि हे असं किती काळ चालणार असा सवाल न्यायालयानं केला. ज्यांना परवडते आणि ज्यांना परवडत नाही अशा लोकांमध्ये फरक न करता दिल्या जाणाऱ्या सुविधा म्हणजे फक्त तुष्टीकरण आहे, आर्थिक विकासाला चालना मिळत नाही, असं न्यायालयानं म्हटलं आहे. जर लोकांना थेट पैसे मिळाले तर ते काम करतील का असं थेट रोख रक्कम हस्तांतरणाच्या योजनांचा उल्लेख करत न्यायालयानं विचारलं.

**<><><><><>**

सर्वोच्च न्यायालयाची पूर्व परवानगी घेतल्याशिवाय आपण देश सोडून जाणार नाही असं हमीपत्र उद्योजक अनिल अंबानी यांनी आज दाखल केलं. रिलायन्स कम्युनिकेशन्स लिमिटेडशी संबंधित मोठ्या बँक कर्जांच्या घोटाळा प्रकरणात सध्या सुरू असलेल्या चौकशीच्या पार्श्वभूमीवर अनिल अंबानी यांनी हे हमीपत्र दिलं आहे. ते न्यायालयाच्या अनुमतीशिवाय देश सोडून जाणार नाहीत अशी हमी त्यांच्यातर्फे त्यांचे वरिष्ठ वकील मुकूल रोहतगी यांनी ४ फेब्रुवारीला न्यायालयात दिली होती. त्याचा पुनरुच्चार त्यांनी या हमीपत्रात केला आहे.

**<><><><><>**

हिंदवी स्वराज्याचे संस्थापक छत्रपती शिवाजी महाराज यांची जयंती आज राज्यासह देशभरात उत्साहात साजरी होत असून ठिकठिकाणी विविध कार्यक्रमांचं आयोजन करण्यात आलं आहे.

उपराष्ट्रपती सी. पी. राधाकृष्णन, प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी शिवाजी महाराजांना समाजमाध्यमावरल्या संदेशाद्वारे अभिवादन केलं आहे.

उपराष्ट्रपती सी. पी. राधाकृष्णन यांनी समाज माध्यमावरील आपल्या संदेशात, महाराजांचा उल्लेख 'स्वराज्याचे शिल्पकार' असा करून ते आत्मनिर्भर भारतासाठी प्रेरणास्त्रोत असल्याचं म्हटलं आहे.

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी समाज माध्यमाद्वारे शिवछत्रपतींना वंदन केलं. महाराजांनी जनहित आणि लोककल्याणाला सदैव सर्वोच्च प्राधान्य दिलं. त्यांचं जीवन आजही भारतवर्षासाठी पथदर्शक आहे असं सांगत पंतप्रधानांनी संस्कृत श्लोकाद्वारे महाराजांच्या दातृत्वाचा आणि धर्मनिष्ठेचा गौरव केला आहे. इतर नेत्यांनीही समाज माध्यमावरून शिवाजी महाराजांप्रति आदर व्यक्त केला आहे.

शिवजयंती हा 'आत्मभानाचा सण' असून महाराजांनी रयतेच्या मनात स्वाभिमानाचं स्फुल्लिंग चेतवलं, ज्यामुळे आजही सामाजिक वीण घट्ट आहे, असं ज्येष्ठ नेते **शरद पवार यांनी आपल्या संदेशात म्हटलं आहे**.

शिवाजी महाराज हे शौर्य, दूरदृष्टी आणि न्यायप्रिय नेतृत्वाचं अद्वितीय प्रतीक आहेत, असं का ॅग्रेस नेते **राहुल गांधी यांनी म्हटलं आहे** .

राज्यातला मुख्य शासकीय सोहळा महाराजांचं जन्मस्थान असलेल्या दुर्गतीर्थ किल्ले शिवनेरीवर मोठ्या थाटात संपन्न झाला.

यावेळी राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस आणि उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी किल्ले शिवनेरीवरील शिवकुंजावर जाऊन छत्रपती शिवाजी महाराज आणि राजमाता जिजाऊ माँसाहेब यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून अभिवादन केलं. मुख्यमंत्री फडनवीस यांनी शिवनेरीवर परंपरेप्रमाणे बाळ शिवरायांचा पाळणा झुलवला आणि शिवरायांच्या पालखीची विधिवत पूजा केली. यावेळी महिलांनी पाळणा गाऊन संपूर्ण परिसर शिवमय करून टाकला.

छत्रपती शिवाजी महाराज नसते, तर आज आपल्याला भारताचा जो इतिहास आणि भूगोल दिसतो, तो दिसला नसता, असं उपस्थितांना संबोधित करताना मुख्यमंत्री म्हणाले. महाराजांचं जलव्यवस्थापन, करप्रणालीतली सुधारणा आणि नौदलाच्या उभारणीतली दूरदृष्टी, त्यांनी आपल्या भाषणात अधोरेखित केली. या सोहळ्याला उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि सुनेत्रा पवार, तसच अन्य मान्यवर उपस्थित होते.

शिवराय मनामनात आणि शिवजयंती घराघरात साजरी करण्याचं आवाहन, काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष **हर्षवर्धन सपकाळ यांनी** केलं आहे.

**<><><><><>**

मुस्लिम समाजामध्ये पवित्र समजला जाणारा रमजानचा महिना आजपासून सुरू झाला. काल संध्याकाळी देशाच्या अनेक भागात चंद्रदर्शन झालं. रमजान हा इस्लामिक दिनदर्शिकेतला नववा महिना आहे. महिन्याच्या शेवटी ईद-उल-फित्र साजरी केली जाते.

**<><><><><>**

नायजेरियामध्ये, पठारी प्रदेशातल्या बाशर या जिल्ह्यात काल शिसं आणि जस्त या धातूंच्या खाणीत झालेल्या विषारी वायू गळतीमुळे ३३ कामगारांचा मृत्यू झाला. तर याच भागात झालेल्या स्फोटात २७ जण जखमी झाले. खाण क्षेत्रातून २० पेक्षा जास्त कामगारांची सुटका करून त्यांना उपचारासाठी रुग्णालयात दाखल केल्याचं तसंच विषारी वायू गळतीचं कारण शोधण्यासाठी तपास सुरु असल्याचं संबंधित सूत्रांनी सांगितलं.

**<><><><><>**

चीनने २०२० साली उत्पादनक्षम अणुचाचणी केल्याचा अमेरिकेचा आरोप असून, नवीन बहुपक्षीय शस्त्र नियंत्रण करारांतर्गत, यापुढे ही गोष्ट सहन केली जाणार नाही असा इशारा

दिला आहे. अमेरिकेच्या शस्त्रास्त्र नियंत्रण आणि प्रसार प्रतिबंध विभागाचे मंत्री ‘क्रिस्टोफर यू’, काल वॉशिंग्टन डीसी इथल्या एका संस्थेत बोलत होते.

चीनने २२ जून २०२० रोजी ‘लोप नूर’ या चाचणी स्थळाजवळ एक अणुचाचणी करून आपली अण्वस्त्र क्षमता सिद्ध केल्याची माहिती अमेरिकेकडे असून, चीन मात्र या गोष्टीची जाहीर कबुली देत नसल्याचं ते यावेळी म्हणाले.

**<><><><><>**

टी ट्वेंटी क्रिकेट विश्वचषक स्पर्धेत आज इटली आणि वेस्ट इंडिज यांच्यात सामना सुरू आहे. इटलीने नाणेफेक जिंकून वेस्ट इंडिजला प्रथम फलंदाजी करण्यासाठी पाचारण केलं.

**//<><><><><>//**